# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

प्रेसनोट

## पीएमपीएमएल कडून भिमा-कोरेगाव येथील विजयस्तंभ मानवंदना कार्यक्रमासाठी जादा बसेसचे नियोजन

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून दिनांक ३१/१२/२०२४ व दिनांक ०१/०१/२०२५ रोजी मौजे पेरणे फाटा (भिमा कोरेगांव) येथे विजयस्तंभास मानवंदना देण्याकरीता येणाऱ्या अनुयायींसाठी जादा बसेसचे नियोजन करण्यात आले आहे.

मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, पुणे यांच्या निर्देशानुसार पीएमपीएमएल कडून खालील ठिकाणाहून बस संचलन करण्यात येणार आहे.

**पीएमपीएमएल कडून खाली दर्शविलेल्या ठिकाणांहून भिमा कोरेगांव विजय स्तंभापर्यंत मोफत बससेवा देण्यात येणार आहे.**

| अ.क्र. | लोणीकंद पोलीस स्टेशन हद्द |
|---|---|
| १ | कुस्ती मैदान, लोणीकंद |
| २ | खंडोबा माळ, लोणीकंद |
| ३ | सैनिकी शाळा, फुलगांव, तुळापूर रोड |
| ४ | चिंचवण हॉटेल/वाय जंक्शन, तुळापूर रोड |
| ५ | पेरणे गाव |

| अ.क्र. | शिक्रापुर पोलीस स्टेशन हद्द |
|---|---|
| १ | जीत पार्कींग, वक्फ बोर्ड, नगररोड |
| २ | पिंपळे जगताप पार्कींग, चाकण रोड |
| ३ | वढू पार्कींग, इनामदार हॉस्पिटल |

तसेच पीएमपीएमएल पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातून इतर मार्गांच्या बसेसने अनुयायींनी वरील पार्कींग पर्यंत तिकीट घेऊन प्रवास करावा.

पीएमपीएमएल कडून भिमा-कोरेगाव येथील विजयस्तंभ मानवंदना कार्यक्रमासाठी जादा बसेसचे नियोजन करण्यात आल्याने दिनांक ३१/१२/२०२४ व दिनांक ०१/०१/२०२५ रोजी पुणे व पिंपरी-चिंचवड शहर, शहरांलगतची उपनगरे व पीएमआरडीए हद्दीतील मार्गांवर बसेसचे प्रमाण कमी राहणार असल्याने प्रवाशांची काही प्रमाणात गैरसोय होऊ शकते. तसेच दि. ०१/०१/२०२५ रोजी कोरेगाव – भिमा येथील विजयस्तंभाला मानवंदना देण्याकरिता येणाऱ्या अनुयायांची पुणेस्टेशन, ससुन रोड व मोलोदिना बसस्थानकावर प्रचंड गर्दी होत असल्यामुळे ससुन रोड व मोलोदिना बसस्थानकावरून सुटणारे सर्व बसमार्ग सकाळपाळीत पुणेस्टेशन डेपो बसस्थानकातून संचलनात राहतील व पुलगेट कडून येरवडा, आळंदी कडे जाणारे बसमार्ग जी.पी.ओ., पुणेस्टेशन डेपो, अलंकार टॉकीज मार्गे संचलनात राहतील. सदरचा

बदल फक्त सकाळपाळीमध्येच करण्यात आलेला आहे. तरी याबाबतची नोंद प्रवाशांनी घ्यावी व परिवहन महामंडळास सहकार्य करावे, असे आवाहन पीएमपीएमएल कडून करण्यात येत आहे.

Sd/-
**चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

दि. २८/१२/२०२४

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

Sd/-
**कामगार व जनता संपर्क अधिकारी**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**